!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# साई केंद्राला विभागीय केंद्राचा दर्जा द्या
# खासदार चंद्रकांत खैरे यांची लोकसभेत मागणी

**संभाजीनगर : ( ता.०५ )** संभाजीनगर मध्ये साई केंद्र १०७ एकर मध्ये भारतीय खेळ प्राधिकरण (एसएआई) हा परिसर पूर्ण भरलेला आहे. संभाजीनगर सह मराठवाड्यातील राष्ट्रीय आंतराष्ट्रीय खेळाडूना राष्ट्रीय पातळीवर जाण्यासाठी साई हे महत्वाचे केंद्र आहे. येथे महाराष्ट्रासह इतर राज्यातील खेळाडूंना सुध्दा या ठिकाणी प्रशिक्षण घेता येईल. भारतीय खेळ प्राधिकरणाच्या परिसरात सर्व सुविधा उपब्लध आहे व या परिसरात भविष्यासाठी खुप काही सुविधा उपब्लध करु शकतो असे ही यावेळी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत मागणी केली. संभाजीनगरमधील भारतीय खेळ प्राधिकरण केंद्राला मागच्या दोन वर्षापासुन विभागीय दर्जा देण्याची मागणी केली करत आहे. परंतु आजपर्यंत ही मागणी पूर्ण झालेली नाही. साई केंद्राला उपकेंद्रचा दर्जा प्राप्त आहे, या सेंटरला ट्रेनिंग सेंटर म्हणुन उपयोग केला जात आहे.

यावेळी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केंद्रिय क्रिडामंत्री यांच्या भारतीय खेळ प्राधिकरण या क्षेत्राला लवकरात लवकर साई केंद्राला विभागीय दर्जा देण्यात यावा अशी मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली. या केंद्रामध्ये सिंथेटिक एथलेटिक ट्रैक, सिथेंटिक हॉकी सरफेस, इंडोर शुटिंग रेंज या आंतरराष्ट्रीय स्तरावर स्विमिंग पुलाचे ही निर्मिती लवकर करण्यात यावे. संबंधित साई केंद्राला आर्थीक वर्षामध्ये विशेष स्वरुपाचा निधी ही देण्यात यावा. या सारख्या खेळ सुविधा आणि पायाभुत सुविधा ही उपलब्ध आहे. २५ फेब्रुवारी २०१५ मध्ये संभाजीनगर येथे भारतीय खेळ प्राधिकरण क्षेत्र केंद्र बनवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे ही प्रस्ताव पाठवला होता. या सर्व खेळाडूंची मागणी लक्षात घेऊन व सर्व परिस्थती बघून आपण साई, भारतीय खेळ प्राधिकरणाला विभागीय दर्जा देऊन खेळाडू व मराठवाड्याला न्याय देण्यात यावा.

प्रसिध्दी प्रमुख

गणेश वाघ / मनोज वडगावकर

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400